**क्षेत्रिय स्तरावरील वनअधिका-यांना प्रदान करावयाचे वित्तीय अधिकार बांबु घटकाच्या धारणा किंमत व निविदा मंजूरीचे अधिकार प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एमएफपी-२०११/प्र.क्र. ३२५/फ-१**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : ७ मार्च, २०१२**

पहा :- १. प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१६/आर-१/बांबु निविदा/१८६/०६-०७, दिनांक १०/५/२००७.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१६/आर-१/प्र.क्र.१३/जी-११७, दिनांक १६/११/२०११.

**प्रस्तावना :-**

वनविभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वित्तीय शक्ती प्रदान करण्याबाबत यापूर्वी वेगवेगळ्या शक्ती प्रदान करण्यात आलेला आहेत. तथापि यापूर्वी प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्ती क्षेत्रिय स्तरावरील कामे करतांना कमी पडतात. त्यामुळे वनविभागातील क्षेत्रिय स्तरावरील कामे प्रभावीपणे पार पाडणे शक्य व्हावे व प्रशासकीय गतिमानता साधावी म्हणून वित्तीय अधिकार नियम पुस्तीका भाग दोन मध्ये वनविभागातील अधिका-यांच्या वित्तीय शक्तीमध्ये वाढ करण्याचीबाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वनविभागाच्या संदर्भात पुर्नरचनेत मोठया प्रमाणात झालेल्या पदाच्या श्रेणीवाढ तसेच क्षेत्रिय स्तरावरील वन अधिका-यांना प्रदान करावयाचे वित्तीय अधिकार वनउपज अपेक्षित किंमती ठरविणे, वनउपज विक्री करणे, महसूल परतावा प्रकरणे इत्यादि संदर्भातील वित्तीय शक्ती मध्ये सुधारणा करण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७६/फ-५, दिनांक ३०/९/२०११ च्या शासन निर्णया प्रमाणे, बांबुच्या किंमती ठरविणे व निविदा मंजूर करणे याबाबतचे वित्तीय अधिकार, क्षेत्रिय स्तरावरील वन अधिका-यांना प्रदान करण्याविषयी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडून उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र. २ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्ट नुसार वित्तीय अधिकार प्रदान करण्यास शाससन मान्यता देण्यात येत आहे. तथापि परिशिष्ठ मध्ये विहित अटी मधून एखादी अट पूर्ण होत नसेल तर अशा प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

२) सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

३) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक

(६१)

सांकेतांक क्रमांक २०१२०३०१०८१६२२३२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विवेक खाडेकर)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग,

सोबत - परिशिष्ट

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. उप मंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
मा. प्रधान सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव (वित्त विभाग)
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनिकरण, महराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
संचालक, लेखा व कोषागारे मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
उप संचालक, लेखा व कोषागार, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व मुख्य वनसंरक्षक
सर्व वनसंरक्षक
सर्व उपवनसंरक्षक
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (विनियम), अर्थ-६. व्यय-१०, मंत्रालय, मुंबई-३२.
कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई-३२
कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
वन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती फ-९

E:\Nilesh\2011\C R 325-2011 Bamboo Nivida.doc- 4 -

| अ क्र | प्रचलीत/ नवीन वरील वित्तीय शक्तीचे वर्णन | शक्तीचा वापर करण्यास सक्षम अधिकारी/ प्राधिकारी | प्रचलीत शक्ती | नविन शक्ती | अटी व शर्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | बांबू घटकाची अपेक्षीत किमत निश्चित करण्याची शक्ती | प्रशासकीय विभाग | पूर्ण अधिकार | - | - |
| | | प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) | -- | पूर्ण अधिकार | |
| २ | बांबू घटकाच्या निष्कासनासाठी निविदा मार्गाणेसाठी निविदा सुचना देण्याची शक्ती | प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) | -- | पूर्ण अधिकार | निविदा सूचना, निविदा प्रपत्र, निविदेची मुदत व अटी, मक्त्याची मुदत व अटी व खरेदीदाराचे करार यासाठी शासनाची मान्यता प्राप्त करण्यात येईल. |
| ३ | बांबू घटकाची निविदा किमत स्वीकारणे किंवा नाकारणे ची शक्ती | १. प्रशासकीय विभाग | पूर्ण अधिकार | ज्या वेळी बोली किमत ही मंजूर अपेक्षित किमतीपेक्षा १५ ते २० टक्के दरम्यान कमी आहे | बोली किमत ही मंजूर अपेक्षित किमतीपेक्षा २० टक्के पेक्षा कमी असल्यास वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. |
| | | २. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) | -- | जेव्हा बोली किमत मंजूर अपेक्षित किमतीपेक्षा १० टक्के [illegible] टक्के दरम्यान कमी आहे | पूर्ण अधिकार |
| | | ३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (संसाधन [illegible]) | -- | जेव्हा बोली किमत ही मंजूर अपेक्षित किमतीपेक्षा ५ टक्के ते १० टक्के दरम्यान कमी आहे. | पूर्ण अधिकार |
| | | ४. मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) | -- | जेव्हा बोली किमत मंजूर अपेक्षित किमती ऐवढी किंवा जास्त किंवा मंजूर अपेक्षित किमतीच्या खाली ५ टक्के पर्यंत बोली आहे. | पूर्ण अधिकार |

(विवेक खांडेकर)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग